StudySite.org StudySite.org

# A

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

CODE : NAT
103801

प्रश्नपुस्तिका

वेळ : दीड तास

चाळणी परीक्षा/SCREENING TEST

एकूण प्रश्न : 150
एकूण गुण : 150

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. - अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचें बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण ***एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.*** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एका वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) ------------------------------------------------------------> (कृपया पान उलटवा)

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org

StudySite.org
StudySite.org
StudySite.org

StudySite.org
StudySite.org



(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **<u>मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.</u>**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न.क्र. **201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र.क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे कंस पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक ह्या तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

## पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे पृष्ठ उलटू नये

StudySite.org

P.T.O.

StudySite.org
StudySite.org

StudySite.org
StudySite.org



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org

StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**1.** खाली दोन विधाने दिली आहेत. या विधानांच्या आधारावर दोन निष्कर्ष दिले आहेत. हे निष्कर्ष बरोबर आहेत की चूक आहेत हे ठरवून दिलेल्या पर्यायातून अचूक पर्याय निवडा.

**विधान** (a) सर्व चिकू पेरू आहेत.

**विधान** (b) सर्व डाळींब हे पेरू नाहीत.

**निष्कर्ष** (a) सर्व डाळींब चिकू आहेत.

**निष्कर्ष** (b) काही डाळींब चिकू आहेत.

(1) फक्त निष्कर्ष (b) बरोबर आहे.
(2) निष्कर्ष (a) व (b) दोन्ही बरोबर आहेत.
(3) फक्त निष्कर्ष (a) बरोबर आहे.
(4) निष्कर्ष (a) व (b) दोन्ही चूक आहेत.

---

**2.** आश्रम शाळेत प्रत्येक वर्गात _________ विद्यार्थी असावेत अशी पात्रता ठरविली आहे.

(1) निवासी 40 व बहिस्थ 20
(2) निवासी 50 व बहिस्थ 20
(3) निवासी 40 व बहिस्थ 10
(4) निवासी 30 व बहिस्थ 20

---

**3.** मनुष्याच्या व्यक्तिमत्वावर कोणत्या गोष्टीमुळे जास्त तणाव निर्माण होतो ?

(1) पारंपारिक जीवन
(2) आधुनिक जीवन
(3) गरीबीतील जीवन
(4) श्रीमंत जीवन

---

**4.** _________ हे नियोजनाचे सूत्र ठरले आहे.

(1) ''समुहाच्याविकासा बरोबरच त्या क्षेत्राचादेखील विकास''
(2) ''कल्याण योजना राबविणे बरोबरच विकास''
(3) ''एकात्मिक विकासाबरोबरच त्या क्षेत्राचादेखील विकास''
(4) ''समुहाच्या विकासाबरोबरच त्या क्षेत्राचा पारंपरिक विकास''

---

**5.** महाराष्ट्रात _________ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आहेत.

(1) 24 (2) 11 (3) 9 (4) 33

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**6.** महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण 2001 साली किती होते ?

(1) 7.22%  (2) 7.20%  (3) 55.2%  (4) 7.23%

---

**7.** __________ कडून प्रेरणा घेऊन अनेक समाज-सुधारकांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यास हातभार लावला आहे.

(1) पं. जवाहरलाल नेहरू  (2) महात्मा गांधी

(3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर  (4) महात्मा फुले

---

**8.** __________ ला वृध्दत्वापासून दूर ठेवता येते.

(1) डोळे  (2) बुध्दि  (3) मन  (4) शरीर

---

**9.** प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल ?

6 : 72 : : 8 : **?**

(1) 92  (2) 80  (3) 128  (4) 96

---

**10.** प्रश्नचिन्हाच्या जागी अचूक अंक असलेला पर्याय कोणता ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | 6 | 12 | 18 | **?** |
| A | D | J | P | V |

(1) 21  (2) 24  (3) 26  (4) 28

---

**11.** 2001 च्या शिरगणतीनुसार महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या किती ?

(1) 8,577276  (2) 40,950000

(3) 50,950000  (4) 60,950000

---

**12.** धोकादायक इमारती नष्ट करणे हे कार्य महानगरपालिकेच्या __________ कार्यात समाविष्ट आहे.

(1) आवश्यक  (2) ऐच्छिक  (3) मर्जीतील  (4) ऐच्छिक व मर्जीतील

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**13.** उत्पादनाच्या साधनांकरता लागणारा पैसा व कुशलता यांचा अभाव हे आदिवासींच्या __________ प्रमुख कारण आहे.

(1) गरिबीचे (2) अवनतीचे (3) बेरोजगारीचे (4) कुपोषणाचे

---

**14.** जिल्हा परिषद पंचायत समितीला वार्षिक अनुदान __________ कारणामुळे देते.

(1) पंचायत समितीला फार कामे असतात

(2) पंचायत समितीला उत्पन्न फार कमी आहे

(3) पंचायत समितीला उत्पन्नाची स्वतंत्र साधने नाहीत

(4) वरील सर्व कारणामुळे

---

**15.** आदिवासींच्या सात्मीकरणाचा पुरस्कार कोणी केला ?

(1) डॉ. धुर्ये व ठक्कर बाप्पा (2) डॉ. हटन व डॉ. मुझूमदार

(3) डॉ. इरावती कर्वे (4) वरील पैकी कोणीही नाही

---

**16.** मानवशास्त्रज्ञांनी आर्थिक क्रियातील बदलांबाबत __________ दृष्टिकोन मांडला आहे.

(1) विकासवादी (2) समाजवादी

(3) साम्यवादी (4) आर्थिक वर्गीकरणवादी

---

**17.** इंग्रजी अक्षरमाला उलटक्रमाने लिहिली असता कोणते अक्षर डावीकडून अकरावे व उजवीकडून सोळावे येईल ?

(1) P (2) Q (3) K (4) J

---

**18.** एका गावातील शिकवण्यायोग्य वयातील 80% मुलांनी शाळेत प्रवेश घेतला. प्रवेश घेतलेल्या मुलांपैकी 40% मुलांनी 1 ते 4 थी दरम्यान शाळा सोडून दिली. पुढे शिकणाऱ्या मुलांपैकी 20% मुलांनी 5 वी ते 7 वी दरम्यान शाळा सोडली, तर 8 वी ते 12 वी दरम्यान गळतीचे प्रमाण 50% होते. 12 वी पूर्ण करून महविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या मुलांची संख्या 24 आहे तर या मुलांनी शाळेत प्रवेश घेतेवेळी गावात एकूण किती मुले होती ?

(1) 48 (2) 60 (3) 100 (4) 125

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**19.** प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा अंक लिहा.

216 : 126, 453 : 543, 789 : **?**

(1) 889 (2) 897 (3) 987 (4) 879

---

**20.** खाली दिलेल्या पर्यायातून कारणांची समीक्षा करा व मायना तपासा, व दिलेल्या पर्यायातून उत्तर निवडा ?

**विधान :** अमेरिकेने अफगाणिस्तानबरोबर युध्द केले.

(1) अमेरिकेला ओसामा बीन लादेन हवा होता

(2) अफगाणिस्तान सरकार लादेनला पाठिंबा देत होते

(3) अफगाणस्थित लादेनने 11 सप्टेंबर रोजी अमेरिकेवर हल्ला केला

(4) वरील सर्व

---

**21.** अनुसूचित जमातीचे प्रमाण पत्र तपासणी समित्या ________ या ठिकाणी कार्यरत आहेत.

(1) मुंबई, पुणे व नाशिक (2) पुणे, नाशिक व नागपूर

(3) पुणे, नागपूर व औरंगाबाद (4) पुणे, नाशिक व चंद्रपूर

StudySite.org

---

**22.** 'डॉ. फादर व्हेरिअर एल्विन' यांच्या मते अदिवासीयांना स्वतंत्र विभाग करुन देणे यास काय संबोधितात ?

(1) राष्ट्रीय एकात्मता (2) राष्ट्रीय सुरक्षितता

(3) राष्ट्रीय विकास (4) राष्ट्रीय उद्दाम

---

**23.** इ.सन. ________ साली चर्च ऑफ दि ब्रेदरेन मिशनने पालघरला ग्रामीण वसतीशाळा सुरु केली.

(1) 1923 (2) 1932

(3) 1903 (4) 1920

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**24.** शरदच्या आत्याची वहिनी श्रीधरची आई आहे तर शरदचे वडील श्रीधरचे कोण आहेत ?

(1) काका (2) वडील (3) चुलतभाऊ (4) मामा

---

**25.** __________ ही मानवी साधन संपत्ती विकास योजना आहे.

(1) सामुदायिक विवाह आयोजित करून अर्थसहाय्य करणे

(2) विट उत्पादकांना अर्थसहाय्य करणे

(3) अपंगाना तीन चाकी सायकल पुरविणे

(4) सायकल दुकानासाठी अर्थसहाय्य करणे

---

**26.** महाराष्ट्रातीत सर्वात जास्त विस्ताराचे खोरे __________ हे आहे.

(1) कृष्णा (2) तापी (3) भीमा (4) गोदावरी

---

**27.** महाराष्ट्र शासनाची 'नवसंजीवन योजना' समाजातील __________ घटकासाठी आहे.

(1) अनुसूचित जाती (2) आदिवासी

(3) अल्पसंख्याक (4) विशेष भागास वर्गीय

---

**28.** डॉ. व्हेरिअर एलव्हिनचे आदिवासी बाबतचे सुरुवातीचे धोरण __________ .

(1) आदिवासींच्या स्वतंत्र वस्त्या ठेवाव्यात, विकसित समाजाच्या संपर्कात आणू नये.

(2) आदिवासींचा सर्वांगीण विकास करावा, स्वतंत्र स्थान द्यावे.

(3) आदिवासींचे कल्याण धोरण राबवावे व विकास करावा.

(4) आदिवासी लोकांचा आर्थिक विकासाचा व कल्याणाचा मार्ग मोकळा करावा.

---

कच्च्या कामासाठी जागा

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**29.** पुढीलपैकी विसंगत संख्या ओळखा ?

61, 11, 31, 91, 41, 71

(1) 61 (2) 41 (3) 91 (4) 11

---

**30.** प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता महिना येईल ?

| | | |
|---|---|---|
| चैत्र | कार्तिक | मार्गशीर्ष |
| वैशाख | श्रावण | आश्विन |
| आषाढ | भाद्रपद | ? |

(1) पौष (2) फाल्गुन (3) जेष्ठ (4) माघ

---

**31.** जर 'BANARAS' हा शब्द सांकेतिक भाषेत 7, 6, 19, 6, 23, 6, 24 असा लिहिला तर 'THURSDAY' या शब्दासाठी खालीलपैकी सांकेतिक पर्याय कोणता ?

(1) 25, 13, 26, 23, 24, 9, 6, 30 (2) 7, 8, 6, 9, 8, 4, 1, 2

(3) 25, 26, 23, 13, 9, 24, 30, 6 (4) 8, 19, 6, 9, 8, 23, 26, 2

---

**32.** काळविटांसाठी ____________ हे महाराष्ट्रातील प्रसिध्द अभयारण्य आहे.

(1) कर्नाळा (2) देउळगांव-रेहेकुरी (3) मेळघाट (4) राधानगर

---

**33.** कोणाच्या संपर्काने आदिवासी लोकांच्या जीवनात वादळी बदल होत आहेत ?

(1) शहरी जीवन (2) बाह्य संस्कृती

(3) सरकारी धोरण (4) आधुनिक जीवन

---

**34.** व्यक्तिमत्व म्हणजे ____________ .

(1) व्यक्तीमधील चारित्र्य व स्वभावाचे वैशिष्ट्यपूर्ण अनुभव.

(2) व्यक्तीमधील मनो-शारीरिक वैशिष्ट्यपूर्ण रचनात्मक गतीशीलता.

(3) व्यक्तीमधील शारीरिक ठेवण व इतरांना प्रभावित करण्याची कला.

(4) व्यक्तीमधील मनोभौतिक संरचनांचे गतीशील संघटन.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**35.** आदिवासीयांच्या मनामध्ये कोणाबद्दल आदर आहे ?

(1) मानवी संबंध (2) धर्म (3) गुरु (4) निसर्ग

---

**36.** अक्षयला त्याचा हजेरीपटातला क्रमांक विचारला असता त्याने सांगितले की, त्याचा क्रमांक दोन अंकी असून त्यातील दुसरा अंक पहिल्यापेक्षा 5 ने मोठा आहे. तसेच त्या दोन अंकाचा गुणाकार करून त्यात 6 मिळवून त्याला दोनाने भागल्यास उत्तर दहा येते, तर अक्षयचा क्रमांक कोणता ?

(1) 72 (2) 27 (3) 38 (4) 94

---

**37.** आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे उद्दिष्ट कोणते आहे ?

(1) आदिवासी जमातीच्या विशेष कृती योजना अभ्यास करून तयार करणे.

(2) आदिवासी जमातीचा सखोल अभ्यास करण्यास प्रोत्साहन देणे.

(3) आदिवासी जमातीला संशोधनाद्वारे प्रशिक्षित करणे.

(4) आदिवासी लोकांच्या समस्या जाणून घेणे.

---

**38.** परिवर्तनाचा कोणताही कार्यक्रम __________ शिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

(1) सहकार्या (2) शिक्षणा

(3) शहरीकरणा (4) समाजकार्या

---

**39.** ग्राहक संरक्षण कायद्याचा प्रमुख हेतू __________ हा आहे.

(1) ग्राहकांना प्रतिष्ठा मिळवून देणे

(2) वस्तूंचा काळाबाजार रोखणे

(3) ग्राहकांच्या हिताची जोपासना करणे

(4) वस्तूंच्या वाढीव किंमतींना आळा घालणे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**


StudySite.org

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**40.** एका विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांनी दाखविलेली करिअर संबधीची आवड वेन आकृतीमध्ये दिली आहे. खालील छायांकित आकृतीवरून काय निष्कर्ष काढाल ?




A इंजिनिअरिंग

B मेडिकल

C एग्रिकल्चर

(1) इंजिनिअरिंग व मेडिकलची आवड असणारे विद्यार्थी.

(2) इंजिनिअरिंग व एग्रिकल्चरची आवड असणारे विद्यार्थी.

(3) इंजिनिअरिंग, मेडिकल व एग्रिकल्चरची आवड असणारे विद्यार्थी.

(4) मेडिकल व एग्रिकल्चरची आवड असणारे विद्यार्थी.

---

**41.** स्थानिक रोजगार निर्मितीचा प्रश्न कशा प्रकारे सुटू शकतो ?

(1) आदिवासींच्या परंपरांचा रोजगाराशी मेळ घालून.

(2) झेरॉक्स मशीन, बॅन्ड पार्टी, सायकल दुकानाला सहाय्य करून.

(3) टायपिंग, संगणक इत्यादी बाबतचे प्रशिक्षण देऊन.

(4) आदिवासींच्या नैसर्गिक संसाधनांवरील जीवन पध्दतीचा विचार करून.

StudySite.org

---

**42.** इ.स. 1922 मध्ये कै. ठक्कर बाप्पा यांनी गुजरातमध्ये कोणती संस्था स्थापन केली ?

(1) भिल्ल सेना (2) भिल्ल सेवा (3) भिल्ल जमात (4) भिल्ल

---

**43.** __________ हा नवसंजीवन योजनेचा एक कार्यक्रम आहे.

(1) महाविद्यालयिन शिक्षण (2) रोजगार विषयक कार्यक्रम

(3) खेळाचे साहित्य वाटप कार्यक्रम (4) करमणूक कार्यक्रम

---

**44.** औरंगाबाद येथील __________ या ठिकाणी वन्य प्राणी अभयारण्य आहे.

(1) अजिंठा (2) वेरूळ (3) गौताळा (4) वैजापूर

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



45. मानववंशशास्त्रज्ञाच्या मते आदिवासींचा विकास करण्यासाठी __________ .

(1) आदिवासींची परंपरागत मूल्ये आणि ऐतिहासिक अनुभवावर जोर दिला पाहिजे.


(2) आदिवासींची सामाजिक रचना आणि विकास लक्षात घेतला पाहिजे.

(3) आदिवासींच्या राजकिय चळवळी लक्षात घेतल्या पाहिजेत.

(4) आदिवासींच्या भावना व अभिवृत्ती लक्षात घेतल्या पाहिजेत.

---

46. प्रश्नचिन्हाच्या जागी खालील पर्यायातील योग्य शब्द निवडा :




(1) धान्य (2) डाळी (3) फळे (4) किडे

---

47. गंगाकल्याण योजनेअंतर्गत 5 ते 15 लाभार्थ्यांना सलग __________ सहाय्य मिळू शकते.

(1) संकरीत गायी-म्हशी पाळण्यासाठी (2) जल-विहीर-सिंचन प्रकल्पासाठी

(3) जमिनीच्या लघुसिंचनासाठी (4) गट रेशीम उत्पन्नासाठी

---

48. द्वारवितरण योजना म्हणजे __________ होय.

(1) रास्तभाव दुकानापर्यंत शिधावस्तु पोहचत्या करणे

(2) रास्तभाव दुकानापर्यंत व आदिवासींच्या द्वारापर्यंत शिधावस्तु पोहचत्या करणे

(3) आदिवासींच्या द्वारापर्यंत शिधावस्तु पोहचत्या करणे

(4) वरीलपैकी सर्व

---

कच्च्या कामासाठी जागा

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**49.** दिवसाला एका पॅकपेक्षा अधिक सिगारेट ओढणारी व्यक्ती सिगारेट न ओढणाऱ्यांच्या तुलनेत दुप्पट हृदयविकाराचा धोका ओढवून घेते. धुम्रपानामुळे फुफ्फुसाचा कॅन्सर व दमाही होण्याची शक्यता वाढते यावरून खालीलपैकी कोणता अन्वयार्थ यथार्थ आहे.

(1) धुम्रपान करणाऱ्याला हृदयविकार, फुफ्फुसाचा कॅन्सर व दमा होईल.

(2) हृदयविकार, फुफ्फुसाचा कॅन्सर व दमा हे धुम्रपानाचे संभाव्य परिणाम आहेत.

(3) धुम्रपान न करणाऱ्याला हृदयविकार, फुफ्फुसाचा कॅन्सर किंवा दमा होणार नाही.

(4) जर एखाद्यी व्यक्ती हृदयविकारानी मेली तर ती धुम्रपान न करणाऱ्यांपेक्षा धुम्रपान करणारी असण्याची शक्यता जास्त आहे.

---

**50.** अदिवासीयांच्या कर्जबाजारीपणाचे प्रमुख कारण कोणते ?

(1) अशिक्षितपणा (2) अंधश्रध्दाळूपणा

(3) भोळा स्वभाव व कायद्याचे अज्ञान (4) प्रेमळ स्वभाव

---

**51.** प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती अक्षरे हवीत ?

C/X E/V G/T I/R **?**

(1) A/Z (2) D/W (3) F/U (4) K/P

---


**52.** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी ________ क्षमतेचे असतात.





(1) आय्.एन्.एस्. (2) आय्.ए.एम्.

(3) आय्.एफ्.एन्. (4) आय्.ए.एस्.

---

**53.** दिलेल्या आकृतीचे पाण्यातील प्रतिबिंब कोणती आकृती दर्शविते ?



(1)  (2)  (3)  (4) 

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**54.** महाराष्ट्र राज्यात आदिवासी कल्याण विभागाचे कामकाज स्वतंत्रपणे इ.सन. __________ पासून सुरु करण्यात आले.

(1) 1973 (2) 1975 (3) 1971 (4) 1972

**55.** राष्ट्रीय ज्ञान आयोग 2005 च्या अध्यक्षांचे नाव __________ आहे.

(1) डॉ. मनमोहन सिंग (2) डॉ. सॅम पित्रोदा

(3) डॉ. भालचंद्र मुणगेकर (4) डॉ. रूपर्ट मरडॉक्

**56.** __________ ज्ञानाचा विकास झाल्याने आदिवासी जीवनाचे सखोल अध्ययन करणे शक्य झाले आहे.

(1) अर्थशास्त्रीय (2) समाज शास्त्राच्या

(3) सामाजिक मानवशास्त्रीय (4) राजकीय शास्त्राच्या

**57.** आदिवासी अतिक्रमित वाड्या-पाड्यांचा प्रश्न कशा प्रकारे सोडवता येईल ?

(1) वाड्या-पाड्यांच्या जमिनीस गावठाण म्हणून मंजूरी देऊन.

(2) वाड्या-पाड्यांतील वनखात्याच्या जमिनी काढून घेऊन.

(3) वाड्या-पाड्यांतील लोकांना सुविधा पुरवून.

(4) वरील सर्व उपाययोजना करून.

**58.** खालील संख्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता अंक येईल ?

4, 5, 7, 7, **?**, 9, 13, 11

(1) 10 (2) 9 (3) 12 (4) 6

**59.** आरोग्यविषयक तक्रारी किंवा एकूण आदिवासींचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य बिघडण्यामागे कोणती कारणे आहेत ?

(1) दारिद्र्य आणि त्यांचे शोषण. (2) उपासमार आणि अंधश्रद्धा.

(3) संसर्गजन्य आजार आणि कुपोषण. (4) अशिक्षितपणा आणि काळी जादू.

**कच्च्या कामासाठी जागा**





StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org




**60.** दिलेल्या आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती आकृती येईल ?



(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

**61.** मानवी शरीराची, __________ - __________ सुस्थित म्हणजेच रोगमुक्त अवस्था म्हणजे आरोग्य होय.

(1) व्यक्तिची व समुदायाची (2) समाजाची व पर्यावरणाची

(3) मनाची व समाजाची (4) मनाची व समुहाची

StudySite.org

---

**62.** आदिवासी कल्याणात्मक योजनांचा हेतू __________ आहे.

(1) विशेष जीवन प्रशिक्षण सहाय्य (2) विशेष गुणवत्ता विकास सहाय्य

(3) नोकरी व विशेष रोजगार निर्मिती सहाय्य (4) विशेष परिस्थितीत तातडीचे सहाय्य

---

**63.** आदिवासींच्या समस्यांचे निवारण करण्याच्या दृष्टीने अभ्यासकांनी __________ या तीन पद्धतीने उपाय योजना करण्याचे सुचविले आहे.

(1) पृथकता, सात्मीकरण आणि एकात्मता

(2) शिक्षण, सांस्कृतीकरण आणि वनसंवर्धन

(3) जागृकता, सादरीकरण आणि विकासात्मकता

(4) वरील सर्व पद्धतीने

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**64.** __________ हा तालुका पंचायत समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो.

(1) ग्रामसेवक (2) गटविकास अधिकारी

(3) सरपंच (4) सभापती

---

**65.** रामूच्या शरीरातील अवयवांचे पूर्णपणे __________ झाल्यामुळे त्याची वाढ थांबली.

(1) वृद्धीकरण (2) परिपक्वन

(3) पौगंडीकरण (4) प्रगल्भीकरण व परिपक्व

---

**66.** डॉ. सिग्मंड फ्राईडच्या मतानुसार खालीलपैकी कोणता एक मनाचा स्तर आहे ?

(1) बोध (2) अहम् (3) विवेक (4) स्मृती

---

**67.** महाराष्ट्रात आदिवासी कल्याण योजना राबविण्यासाठी राज्यस्तरावर कोणाची नियुक्ति केली आहे ?

(1) आदिवासी कल्याण अधिकारी (2) आदिवासी कल्याण आयुक्त

(3) आदिवासी कल्याण संचालक (4) आदिवासी कल्याण सचिव

---

**68.** 'आई' म्हटले की सर्वात महत्वाचे काय ?

(1) प्रेम (2) वात्सल्य (3) मूल (4) जिव्हाळा

---

**69.** ज्या व्यक्तिंना शारीरिक व मानसिक निरामयता लाभलेली आहे तेच __________ घेऊ शकतात.

(1) आर्थिक लाभ (2) सुखोपयोग

(3) इतरांची काळजी (4) योग्य निर्णय

---

**70.** एका वर्षात हर्षलची ऊंची 136 सें. मीटर वरुन 140 सें. मीटर व वजन 29 किलोग्रॅम वरुन 32 किलोग्रॅम झाले, म्हणून या बदलास __________ म्हणता येईल.

(1) विकास (2) कारक विकास

(3) वाढ (4) योग्य विकास व वाढ

---

**कच्च्या कामासाठी जागा**


**P.T.O.**





StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



**71.** खालील आकृतीसारखीच आकृती दिलेल्या पर्यायातून निवडा :



(1)  (2)  (3)  (4) 

---

**72.** श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाची स्थापना ________ यांनी केली.

(1) ज्योतिराव फुले (2) पंडिता रमाबाई

(3) सर विठ्ठलदास ठाकरसी (4) धोंडो केशव कर्वे

---

**73.** विलायती कपडा न वापरता देशी कपडा वापरावा; त्यातच राष्ट्राचे हित आहे, ही कल्पना प्रथमतः ________ राज्यामध्ये निघाली.

(1) गुजरात (2) बंगाल (3) महाराष्ट्र (4) राजस्थान

---

**74.** भंडारदरा या ठिकाणी ________ आहे.

(1) आयुक्त, आदिवासी विकास विभाग कार्यालय

(2) महाराष्ट्र आदिवासी विकास विभागीय कार्यालय

(3) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय

(4) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे उपप्रादेशिक कार्यालय

---

**75.** जर 4096 : 64 तर 3136 : ?

(1) 34 (2) 86 (3) 56 (4) 54

---

**76.** व्यक्तिमत्वाचा अहम् भाग म्हणजे ________ .

(1) सुखतत्व (2) कामशक्तीतत्व

(3) वास्तवतातत्व (4) सदसद्‌विवेकतत्व

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org
StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**77.** खग : विहंग : : कल्लोलिनी : ?

(1) पक्षी (2) कोलाहल (3) आवाज (4) सरिता

---

**78.** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत ________ तालुक्यात एकाधिकार खरेदी योजना राबविण्यात येते.

(1) 14 जिल्हे व 67 (2) 15 जिल्हे व 67

(3) 21 जिल्हे व 52 (4) 15 जिल्हे व 66

---

**79.** भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे सहज आकलन व्हावे म्हणून त्यांचे __________ चार भागात वर्गीकरण केले आहे.

(1) सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय

(2) सामाजिक, आर्थिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय

(3) सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, न्याय

(4) राजकीय, आंतरराष्ट्रीय, घटनात्मक, सामाजिक

StudySite.org

---

**80.** अनुजा घरापासून 12 मीटर उत्तरेकडे गेली व पश्चिमेकडे वळून 8 मीटर गेली. नंतर दक्षिण दिशेला वळून 3 मीटर अंतर पार करून पूर्वेकडे 8 मीटर अंतर चालली तर ती घरापासून कोणत्या दिशेला आहे ?

(1) पूर्व (2) पश्चिम (3) दक्षिण (4) उत्तर

---

**81.** पाचव्या पंचवार्षिक (1974 - 79) योजनेमध्ये आदिवासी विकासासाठी ________ रु. खर्च झाला.

(1) 1180 करोड (2) 1181 करोड (3) 1182 करोड (4) 1183 करोड

---

**82.** धर्नवाल्ड व अन्य मानवशास्त्रज्ञांनी असे स्पष्ट केले आहे कि, आदिवासींचे आर्थिक प्रयत्न हे प्रामुख्याने ________ स्वरूपाचेच असतात.

(1) वैयक्तिक (2) सामूहिक (3) जातीय (4) यांत्रिक

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**83.** आदिवासी जमातीतील लोकांना राष्ट्रीय जीवनाच्या प्रमुख प्रवाहामध्ये आणण्याचे काम कोणी केले ?

(1) पंतप्रधान (2) घटनेतील तरतुदी

(3) आदिवासी कल्याण अधिकारी (4) आदिवासी कल्याण आयुक्त

---

**84.** __________ हा सर्वच आदिवासींचा गंभीर प्रश्न आहे.

(1) अंधविश्वास (2) अकुशलता (3) नशा (4) व्यसनाधिनता

---

**85.** पं. जवाहरलाल नेहरुंच्या मते आदिवासी क्षेत्रात काम करणारे अधिकारी कसे असावेत ?

(1) वेळेचे बंधन स्वीकारणारे, उच्च शिक्षित अधिकारी

(2) बुद्धीचा वापर करून समस्या सोडवू शकणारे अधिकारी

(3) नियोजित कार्य करणारे, अधिकार वापरणारे अधिकारी

(4) विनम्रपणे काम करणारे व प्रज्ञावंत अधिकारी

---

**86.** 8 वर्षापूर्वी मुक्ताचे वय शबरीपेक्षा 7 वर्षांनी जास्त होते. मुक्ता आज 18 वर्षांची असल्यास 5 वर्षांनी शबरीचे वय किती असेल ?

(1) 18 वर्षे (2) 16 वर्षे (3) 12 वर्षे (4) 22 वर्षे

---

**87.** व्यक्तीच्या __________ बदलांना विकास म्हणता येईल.

(1) शारीरिक आकारमानातील (2) कारक

(3) गुणात्मक (4) संख्यात्मक

---

**88.** दिलेल्या शब्दाशी साम्य असलेला शब्द पर्यायातून ओळखा :

बाचाबाची :

(1) चोळामोळा (2) आईवडील (3) देवपूजा (4) पुरणपोळी

---

**89.** आदिवासी माणूस हा मूलतः __________ जीवन जगणारा एक प्राणी आहे.

(1) स्वतंत्र (2) नैसर्गिक (3) स्वावलंबी (4) सहकार्याचे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org




**90.** हळद या बहुगुणी भारतीय वनस्पतीचे बौद्धिक संपदाहक्क भारतीयांसाठी रक्षण करण्यासाठी __________ या शास्त्रज्ञाने आंतरराष्ट्रीय लढा दिला.


(1) डॉ. एम्.एस्. स्वामीनाथन्
(2) डॉ. वसंत गोवारीकर
(3) डॉ. जयंत नारळीकर
(4) डॉ. रघुनाथ माशेलकर

---

**91.** खाली आकृत्यांचा एक गट दिला आहे, त्या गटाशी जुळणारी आकृती कोणती ?



**पर्यायी उत्तरे :**



(1) (2) (3) (4)

---

**92.** डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी आदिवासी भागात कमी खर्चात बालमृत्यू कमी करण्यासाठी कोणती पध्दत वापरली ?

(1) प्रत्येक गावातील आईवडीलांना जागृत केले.
(2) प्रत्येक गावात एका व्यक्तिला 'बेअरफुट डॉक्टर'चे प्रशिक्षण दिले.
(3) प्रत्येक गावात आरोग्यज्ञान व प्रशिक्षण दिले.
(4) बालमृत्यूची कारणे प्रत्येक गावातील लोकांना वर्णन केली.

studysite.org

---

**93.** 31 मार्च 1990 ला सातव्या पंचवार्षिक योजनेची मुदत संपली व आठवी पंचवार्षिक योजना __________ ला सुरू झाली.

(1) 1 एप्रिल 1990
(2) 1 मे 1991
(3) 1 एप्रिल 1992
(4) 1 मे 1992

---

**94.** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत किती उत्पादन करावे, हे __________ च्या आधारे ठरवले जाते.

(1) उत्पादना
(2) कच्च्या माला
(3) मनुष्य बळा
(4) उपभोक्त्यांच्या मागणी

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**95.** लढाई करण्यासाठी सगळ्यात आवश्यक गोष्ट कोणती ?

(1) हत्यारे (2) सैनिक (3) शत्रू (4) रणांगण

---

**96.** माधुरीला दिल्लीपेक्षा शिमला जास्त आवडते. ती शिमल्याला जेवढ्या वेळा गेली त्यापेक्षा ती जास्त वेळा काश्मीरला गेली. काश्मीरपेक्षा ती शिमल्याला खूपच कमी वेळा गेली. पण ती सगळ्यात जास्त वेळा दिल्लीलाच गेली. दिलेल्या माहितीच्या आधारे खालील पैकी एक सोडून सर्व निष्कर्ष बरोबर आहेत. तर चुकीचा निष्कर्ष कोणता ?

(1) माधुरी सर्वात जास्त वेळा दिल्लीला गेली.

(2) माधुरी शिमल्यापेक्षा काश्मीरला जास्त गेली.

(3) काश्मीरपेक्षा ती शिमल्याला कमी वेळा गेली.

(4) माधुरीला दिल्ली जास्त आवडते म्हणून ती सगळ्यात जास्त वेळा दिल्लीलाच गेली.

---

**97.** डॉ. सिग्मंड फ्राईडच्या मते, व्यक्तिमत्वाच्या कोणत्या भागामुळे व्यक्तीला स्वतःच्या सत्कृत्यांबद्दल अभिमान वाटतो ?

(1) अहम् (2) परमाहम् (3) सद्सदविवेक (4) इदम्

---

**98.** दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटना म्हणजे __________ होय.

(1) SAARK (2) SAARC (3) SARCC (4) SARRC

---

**99.** कबीर, अखिल, तस्लिमा, बराक आणि गोविंदसिंग हे जिन्याच्या पाच पायऱ्यांवर बसले आहेत. कबीर आणि गोविंदसिंग यांच्या मध्यावर तस्लिमा बसली आहे. बराक तस्लिमापेक्षा एक पायरी खाली आहे. गोविंदसिंग अखिलपेक्षा तीन पायऱ्याखाली आहे. अखिल हा तस्लिमाच्या जितका वर आहे, तितकीच तस्लिमा बराकच्या वर आहे. दिलेल्या माहिती आधारे वरून दुसऱ्या आणि चौथ्या पायरीवर अनुक्रमे कोण बसले आहे ?

(1) कबीर-अखिल (2) अखिल-बराक (3) तस्लिमा-गोविंदसिंग (4) गोविंदसिंग-कबीर

---

**100.** आदिवासी युवकांच्यामध्ये व्यावसायिक कौशल्य, ज्ञान मिळावे म्हणून असणाऱ्या व्यवसाय प्रशिक्षणास शैक्षणिक पात्रता __________ आहे.

(1) किमान 10 वी पास (2) किमान 9 वी पास

(3) किमान 8 वी पास (4) किमान 12 वी पास

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**101.** मानवी आरोग्याचा संबंध थेट त्याच्या __________ आहे.

(1) मनाशी (2) मेंदूशी (3) स्वभावाशी (4) वागणूकीशी

---

**102.** माणसाच्या बाबतीत __________ हे शक्तिवर्धकासारखे आहे.

(1) रडणे (2) पाणी (3) हास्य (4) बोलणे

---

**103.** नवीन आश्रमशाळा स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव __________ यांच्या कडे सादर करावा लागतो.

(1) 4 प्रतीत, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास

(2) 3 प्रतीत, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास

(3) 5 प्रतीत, शासन व आदिवासी मंत्री

(4) 4 प्रतीत, आयुक्त, आदिवासी विकास

---

**104.** खालीलपैकी कोणत्या व्यक्तिला 2009 चे रसायनशास्त्र विषयातील नोबेल पारितोषिक प्राप्त झाले ?

(1) ॲडा योनाथ (2) एलिझाबेथ ब्लॅकबर्न

(3) कॅरॉल डब्ल्यू ग्रेडर (4) जॅक डब्ल्यू झोस्ताक

---

**105.** खाली दोन विधाने दिली आहेत त्यावरून कोणता निष्कर्ष सत्य आहे हे ओळखा ?

**विधाने** (a) काही मांजरे काळी आहेत.

(b) सर्व कावळे काळे आहेत.

**निष्कर्ष** (a) काही मांजरे काळी नाहीत.

(b) काही काळे कावळे आहेत.

(1) (a) सत्य (2) (b) सत्य (3) (a) व (b) सत्य (4) (a) व (b) असत्य

---

**106.** पश्चिम बंगालमधील सिंगनूर येथून 'नॅनो' कारचे उत्पादन गुजरात येथील __________ या ठिकाणी हलविण्यात आले.

(1) उमरगाव (2) बिलिमोरा (3) आणंद (4) साणंद

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



**107.** जागतिक 'पर्यावरण दिन' __________ या दिवशी साजरा केला जातो.

(1) 11 जुलै (2) 5 जून (3) 24 नोव्हेंबर (4) 1 डिसेंबर

---

**108.** चुकीचे पद ओळखा ?

2, 6, 15, 30, 56, 92

(1) 15 (2) 30 (3) 6 (4) 56

---

**109.** आदिवासींचे आर्थिक शोषण कमी केल्याशिवाय आदिवासी विकास योजनांचा दृष्य परिणाम आढळून येणार नाही. त्यासाठी काय केले पाहिजे ? असे डॉ. गोविंद गारेंना वाटते.

(1) आदिवासींच्या प्राथमिक गरजेच्या वस्तु माफक दरात व सुलभ रीतीने मिळाल्या पाहिजेत.

(2) योग्यवेळी व माफक दराने कर्ज मिळाले पाहिजे.

(3) गरजेच्या वेळी मजूरी मिळण्याची हमी पाहिजे.

(4) वरील सर्व सुविधा केल्या पाहिजेत.

StudySite.org

---

**110.** एका वर्गात 25% गणितात, तर 37% मुले इंग्रजीत उत्तीर्ण झाली 13% मुले दोन्ही विषयात उत्तीर्ण झाली. तर किती टक्के मुले या दोन्ही विषयात अनुत्तीर्ण झाली ?

(1) 49% (2) 41% (3) 51% (4) 25%

---

**111.** सरकारने आखलेल्या अनेकविध चांगल्या योजनांचे आदिवासी भागात मातेरे झाले आहे; कारण __________ .

(1) आदिवासींच्या दु:खाचे मूळ स्वरूपचमुळी सरकारला कळले नाही.

(2) आदिवासींच्या समस्या अनंत काळापासून आहेत व अनंत आहेत.

(3) आदिवासींचा विकास खऱ्या अर्थाने सरकारला नको आहे.

(4) आदिवासींच्या परंपरा व संस्कृती विविधता असलेली आहे.

---

**112.** आदिवासी वन संरक्षण कायदा (The Forest Protection Act) __________ साली पास झाला.

(1) जुलै 2008 (2) जुलै 2004

(3) मे 2005 (4) जुन 2007

---

कच्च्या कामासाठी जागा

StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



113. आदिवासींच्या दारिद्र्यामुळे त्यांचे शिक्षण होत नाही आणि शिक्षण नसल्यामुळे ________ त्यांचा पिच्छा सोडत नाही.

(1) शोषण (2) दारिद्र्य (3) भूतपिशाच (4) सावकारीपाश

---

114. प्रश्नचिन्हाचे जागी योग्य पर्यायाची निवड करा.

96 (206) 112

76 (169) 93

112 ( ? ) 17

(1) 139 (2) 129 (3) 119 (4) 152


---

115. आदिवासी लोकसंख्येचा विचार केल्यास महाराष्ट्र हे भारतातील कोणत्या क्रमांकाचे राज्य आहे.


(1) पहिल्या (2) चौथ्या (3) सहाव्या (4) पाचव्या

---

116. पुढील आकृत्यांची मालिका पूर्ण करा.




**पर्यायी उत्तरे :**



(1) (2) (3) (4)

---

117. एका अष्टकोनाकृती जागेला कुंपण करण्यासाठी खांब रोवावयाचे आहेत. प्रत्येक बाजूला समान अंतरावर 23 खांब रोवायचे असतील तर पूर्ण कुंपणासाठी एकूण किती खांब लागतील ?

(1) 184 (2) 176 (3) 218 (4) 182

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

StudySite.org StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



118. वीज पंप किंवा तेल पंप योजना कमाल __________ आदिवासी शेतकऱ्यांसाठी आहे.

(1) 16 एकरपर्यंत शेतजमीनधारक
(2) 6 एकरपर्यंत शेतजमीनधारक
(3) 18 एकरपर्यंत शेतजमीनधारक
(4) 10 एकरपर्यंत शेतजमीनधारक

---

119. 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' या चार राजांचा कालावधी अनुक्रमे इ.स.पू. 528; इ.स.पू. 28 ते इ.स.पू. 18, इ.स. 1627 ते इ.स. 1676 आणि इ.स.पू. 325 ते इ.स.पू. 297 आहे. तर सर्वाधिक कमी कालावधी लाभलेला राजा कोण ?

(1) ब
(2) ड
(3) अ
(4) क

---

120. आदिवासींना पावसाळ्यात खावटी कर्जवाटप योजनेची गरज का असते ?

(1) खाद्य खरेदीची कुवत नसते म्हणून.
(2) खाद्य खरेदी करता यावे म्हणून.
(3) कुपोषण टाळता यावे म्हणून.
(4) वरील सर्व कारणे असतात म्हणून.

---

121. स्थानिक आदिवासी व्यक्ती व कुटुंब केंद्रबिंदू मानून त्यांचे जीवनमान वाढविण्याच्या दृष्टीने __________ योजना राबविल्या जातात.

(1) आर्थिक विकास
(2) न्यूक्लिअस बजेट
(3) विशेषकृती
(4) गृहनिर्माण

---


122. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या आहे ?

| | | |
|---|---|---|
| 4 | 49 | 9 |
| 25 | ? | 36 |
| 16 | 64 | 1 |

(1) 67
(2) 81
(3) 91
(4) 79

---

123. आकृतीचे निरीक्षण करून प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य संख्या लिहा.




(1) 48
(2) 56
(3) 72
(4) 46

---

कच्च्या कामासाठी जागा

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



**124.** आदिवासी यांच्या बंदिस्त व स्वतंत्र जीवनावर प्रामुख्याने खालीलपैकी कोणी आक्रमण केले ?

(1) सामाजिक शास्त्रे (2) पैशाचे अर्थशास्त्र

(3) राज्यशास्त्र (4) भौगोलिक शास्त्र

---

**125.** खालीलपैकी कोणता अक्षर समूह इतरांसारखा नाही ?

Cat, Bat, Pat, Rat

(1) Cat (2) Bat (3) Pat (4) Rat

---

**126.** कुपोषण होऊन दरवर्षी शेकडो आदिवासी मुले मरतात, कारण __________ .

(1) दारिद्र्यामुळे मुलांना आहारातून जीवनसत्वे व खनिजे मिळत नाहीत.

(2) आदिवासी भागात कुपोषणाची फार मोठी समस्या असल्यामुळे वैद्यकीय सुविधा मिळत नाही.

(3) स्वास्थ्यावर परिणाम करणारे रोगजंतू शरीरात गेल्याने मरतात.

(4) भगत व मांत्रिकांमार्फत उपाययोजना व उपचार केल्याने ते मरतात.

---

**127.** महात्मा गांधींनी आदिवासी विकासाचा प्रश्न __________ भूमिकेवरून हाताळला.

(1) भूतदयावादी (2) उदारमतवादी

(3) एकात्मवादी (4) अलिप्तवादी

---

**128.** सरकारने 24 जुलै 1991 रोजी नवीन आर्थिक धोरण संसदेला सादर केले या धोरणाची तीन उद्दिष्टे __________ होती.

(1) उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण

(2) खाजगीकरण, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण

(3) जागतिकीकरण, भांडवलीकरण, उदारीकरण

(4) सामाजिकीकरण, खाजगीकरण, भांडवलीकरण

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**129.** जर पहिल्या पानावरील एक परिच्छेद शीर्षकासहित दुसऱ्या पानावर घ्यायचा असेल तर त्यासाठी लागणाऱ्या जागेची व्यवस्था करावयाची झाल्यास, दुसऱ्या पानावरील किती परिच्छेद-शीर्षकासहित किंवा शीर्षकाशिवाय हलवावे लागतील ?

(1) दोन परिच्छेद, शीर्षकासहित (2) तीन परिच्छेद, शीर्षकासहित

(3) एक परिच्छेद, शीर्षकासहित (4) चार परिच्छेद, शीर्षकाशिवाय

---

**130.** व्यक्तिमत्वाविषयीचा गुणविशेष दृष्टिकोन म्हणजे ________ .

(1) विचार जोपासायची, मनाची विश्लेषणात्मक पद्धत.

(2) विचार करण्याची, भावना अनुभवण्याची व वर्तन करण्याची टिकाऊ पद्धत.

(3) विचार, दृष्टिकोन व भाव-भावनांची टिकाऊ पद्धत.

(4) विचार करण्याची, जुळवून घेण्याची व दर्शनीय टिकाऊ पद्धत.

---

**131.** प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य संख्या लिहा.

83 : 11 : : 32 : **?**

(1) 71 (2) 21 (3) 6 (4) 5

---

**132.** भारतात हरित क्रांतीस ________ पासून सुरूवात झाली.

(1) 1962 (2) 1960 (3) 1964 (4) 1966

---

**133.** भारतीय स्थल निर्देशक नकाशात समुद्र सपाटीपासूनची कमी उंची (0 ते 0.75 मी.) ________ रंगाने दर्शवितात.

(1) गर्द तपकिरी (2) फिक्कट हिरवा (3) साधारण हिरवा (4) गर्द हिरवा

---

**134.** खालील समीकरणात कोणत्या पर्यायातील चार चिन्हे क्रमाने घातल्यास गणिती विधान सत्य येईल ?

50 2 04 50 50

(1) (× − ÷ =) (2) (= − × ÷) (3) (− × ÷ =) (4) (÷ × − =)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org
StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



**135.** विजोड पद ओळखा ?

(1) भुवनेश्वर (2) भोपाळ (3) पटना (4) पनवेल

---

**136.** __________ हे शहर सरोवरांचे शहर म्हणून ओळखले जाते.

(1) जयपूर (2) भुवनेश्वर (3) बंगळूर (4) उदयपूर

---

**137.** समाज व व्यक्ती यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास __________ चा मुख्य विषय आहे.

(1) राज्यशास्त्र (2) न्यायशास्त्र (3) मानववंशशास्त्र (4) नागरिकशास्त्र

---

**138.** शासनाने कुपोषणावर एकच तोडगा आणला आहे आणि तो म्हणजे __________ योजना होय.

(1) खावटी कर्ज (2) नवसंजीवनी

(3) रोजगार हमी (4) लसीकरण

---

**139.** पूर्वेकडे तोंड करून चालणारी एक व्यक्ती दोन वेळा उजवीकडे वळली. त्यानंतर तीन वेळा डावीकडे वळल्यावर काही अंतर सरळ चालत गेली आणि मग पुन्हा उजवीकडे वळून चालू लागली तर तिच्या डाव्या हाताला कोणती दिशा असेल ?

(1) पूर्व (2) पश्चिम (3) दक्षिण (4) उत्तर

---

**140.** एक रांगेत सीमाचा डावीकडून सहावा क्रमांक आहे. तिच्या उजवीकडे आठव्या क्रमांकावर असलेल्या नीताचा उजवीकडून बारावा क्रमांक आहे तर रांगेत एकूण मुली किती ?

(1) 23 (2) 24 (3) 25 (4) 26

---

**141.** 2009 महाराष्ट्र विधानसभेसाठी झालेल्या मतदानामध्ये गोंदिया जिल्ह्यातील __________ या गावातील एकाही व्यक्तीने मतदानाचा हक्क बजावला नाही.

(1) फुलसावंगी (2) फुलउमरी (3) फुलचूर (4) फुलचूरपेठ

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**142.** आदिवासींना मजुरीसाठी स्थलांतर करावेच लागते; कारण ________ .

(1) आदिवासी भागात नियमित रोजगार मिळत नाही

(2) आदिवासींना स्थलांतर करण्याची सवय आहे

(3) ठेकेदार त्यांना स्थलांतर करण्यास भाग पाडतो

(4) आदिवासींना कुशल काम येत असल्यामुळे

---

**143.** भारतीय राज्यघटनेत आदिवासींचा उल्लेख ________ असा आहे.

(1) आदिम जमाती (2) अनुसूचित जमाती

(3) आदिवासी जमाती (4) अनुसूचित जाती

---

**144.** आदिवासींना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेचे लाभार्थींची निवड करणाऱ्या जिल्हास्तरीय समितीचा अध्यक्ष कोण असतो ?

(1) जिल्हाधिकारी (2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

(3) अप्पर आयुक्त, आदिवास विकास प्रकल्प (4) उपजिल्हाधिकारी

StudySite.org

---

**145.** या शब्दांतील रिकाम्या जागी कोणते आद्याक्षर लिहिल्यास ते शब्द अर्थपूर्ण होतील ?

(a) __ ist (b) __lew (c) Fi__th (d) gi__t

(1) L (2) M (3) f (4) b

---

**146.** एका क्रिकेटच्या संघातील 11 खेळाडूंनी प्रत्येकाला नमस्ते म्हटले तर 'नमस्ते' हा शब्द किती वेळा येईल ?

(1) 132 (2) 55 (3) 112 (4) 110

---

**147.** अनुसूचित जमातीच्या जातीच्या दाखल्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रत्येक सुनावणीच्या वेळी ________ सदस्यांचा कोरम आवश्यक असतो.

(1) 4 (2) 5 (3) 7 (4) 3

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**148.** विसंगत वाद्य ओळखा ?

(1) गिटार (2) व्हायोलीन (3) सनई (4) सतार

---

**149.** प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा ?

| | | |
|---|---|---|
| 23 | 92 | 46 |
| 37 | 148 | 74 |
| ? | 192 | 96 |

(1) 48 (2) 43 (3) 58 (4) 56

---

**150.** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना ________ साली झाली.

(1) 1972 (2) 1973 (3) 1975 (4) 1978

---

- o O o -

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org


कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org
StudySite.org
StudySite.org